राज्यातील विविध क्षेत्रातील उद्योगांना वीजदर सवलत देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१८४/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ८ मार्च, २०१९.

संदर्भ: १. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण -२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दिनांक ०४.०६.२०१६.

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण -२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दिनांक २९.०६.२०१६.

प्रस्तावना :

विदर्भ, मराठवाडा,उत्तर महाराष्ट्र, डी व डी + क्षेत्रातील औद्योगिक विकासास चालना देण्याकरिता या क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीजदरात सवलत संदर्भाधिन अनुक्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली. त्यानुसार या क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना इंधन समायोजन आकार सवलत, उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत व नवीन उद्योगांना प्रोत्साहनपर सवलत दिनांक ०१.०४.२०१६ पासून देण्यात येत आहे. सदर योजनेची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत आहे. विद्युत अधिनियम, २००३ कलम-६५ मधील तरतुदीनुसार सदर सवलतीची भरपाई आर्थिक सहाय्याच्या स्वरुपात महावितरण कंपनीस करण्यात येत आहे.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील कार्यरत औद्योगिक ग्राहकांना विद्यमान सवलती देऊन त्यांची कार्यक्षमता, विस्तारीकरण, गुंतवणूक, आधुनिकीकरण यामध्ये वृध्दी होण्याची अजूनही आवश्यकता आहे. यामुळे रोजगार निर्मितीमध्ये वाढ, कर रुपाने शासनाच्या महसूलात वाढ तसेच पुरक उद्योगधद्दयांमध्ये वाढ इत्यादी फायदे अपेक्षित आहेत. तसेच तेथील नागरीकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

राज्यामधील केवळ १४% औद्योगिक ग्राहक विदर्भातील तर १०% औद्योगिक ग्राहक हे मराठवाड्यातील आहेत. त्यामुळे सदर भागामध्ये औद्योगिक विकास होण्यासाठी अद्यापही पुरेसा वाव असून केवळ तीन वर्षात अधिक वाढ दृष्यमान परिस्थितीत दिसून येणे शक्य नाही. त्यामुळे सदर योजनेचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत वाढविल्यास विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी + क्षेत्रामध्ये नवीन उद्योगांची वाढ होऊ शकेल.

उपरोक्त बाबी लक्षात घेता विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी + क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना यापुढेही सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

१. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी + क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सवलतीची वार्षिक मर्यादा सदर योजना लागू झालेल्या दिनांकापासून रुपये १२०० कोटी पेक्षा जास्त राहणार नाही याची दक्षता महावितरण कंपनीव्दारे घेण्यात यावी.

२. सदर योजने संदर्भात गठित करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमिती मध्ये मा. मंत्री (वित्त) यांचा समावेश करण्यात यावा. त्याअनुषंगाने संबंधित शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.

३. सदर योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या सवलतीची कार्यपध्दती व अनुज्ञेयता ही या संदर्भात गठित केलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या मान्यतेने करण्यात यावी.

४. सदर योजना सन २०१९-२० ते सन २०२३-२४ पर्यंत राबविण्यात यावी.

५. सदर योजनेत कोल्हापूर जिल्हयातील फौन्ड्री उद्योगांचा समावेश करुन त्यांच्या वीजदरात योग्य सवलत सन २०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीकरिता देण्यात यावी. याबाबत स्वतंत्र मंत्रीमंडळ प्रस्ताव सादर करण्यात येईल.

६. सदर सवलतीच्या प्रतिपुर्तीकरिता महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. सदर योजनेचा वार्षिक आढावा घेण्यात यावा. सदर योजनेची अंमलबजावणी महावितरण कंपनीने करावी व सहामाही अहवाल शासनास सादर करावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र. ६७/२०१९/व्यय-१६, दिनांक ०५.०३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३०८१५३१०२१११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2019.03.08 15:34:08 +05'30'

(प्रशांत पुं.बडगेरी)
शासनाचे उप सचिव

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१५. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. कक्ष अधिकारी(व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. कक्ष अधिकारी (नियोजन 1461), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.